17 APR 2018 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे सातारा उपकेंद्र लवकरच

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची तत्त्वतः मान्यता

वार्ताहर, कराड

**शिवाजी विद्यापीठाचे** सातारा येथे उपकेंद्र सुरू करण्याबाबत खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी प्रस्तावित केलेल्या मागणीस शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी तत्त्वतः मान्यता दिली आहे.

उदयनराजे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त बैठकीत उपकेंद्राच्या जागेचा प्रश्न व अन्य आनुषांगिक प्रश्न सोडवण्यात येतील. यामुळे सातारा जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न विद्यार्थी, महाविद्यालयेक व प्राध्यापक-सेवकवर्ग यांच्यासाठी मोठी सुविधा निर्माण होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे सिनेट सदस्य व नगरसेवक ॲड. डी. जी. बनकर यांनी दिली आहे.

राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खासदार उदयराजे यांनी जिल'ातील विद्यार्थ्यांच्या रास्त सुविधेसाठी विद्यापीठाचे उपकेंद्र सातारा येथे सुरू होण्याबाबत प्रस्तावित केलेले होते. त्यावर मंत्री महोदयांनी उपकेंद्राच्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू होण्याबाबत शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य या नात्याने, शिवाजी विद्यापीठाचे मॅनेजिंग कॉन्सिल सदस्य अमित कुलकर्णी यांच्यासमवेत, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे हा प्रश्न उपस्थित केला असता, सातारा येथे उपक्रेंद सुरू करण्यास त्यांनी तत्त्वतः मान्यता दिली. तसेच या वेळी खासदार भोसले यांच्याशी त्यांनी दूरध्वनीवरून चर्चा करताना सातारा येथे उपकेंद्र सुरू करण्यास शिवाजी विद्यापीठ सकारात्मक आहे असे सांगितले. सातारा येथे उपकेंद्र सुरू करण्यासाठी एप्रिल महिन्याच्या अखेरीस सातारा जिल्हा प्रशासन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची बैठक खासदार भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे.

या बैठकीत उपकेंद्राच्या जागेचा प्रश्न सोडवण्याबरोबरच अन्य बाबीविषयी सर्व निर्णय घेतले जाणार आहे. त्यामुळे लवकरच शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू होऊन, सातारा जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणारे अनेक विद्यार्थी, प्राध्यापक-सेवकवर्ग व महाविद्यालये यांची होणारी गैरसोय उदयनराजे भोसले यांच्या प्रयत्नांमुळे दूर होणार असल्याचे ॲड. बनकर यांनी नमूद केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2018
सकाळ

## संशोधन शेतकऱ्यांना उपयोगी ठरावे

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या रूसा केंद्रामार्फत औषधी व सुगंधी वनस्पतीची लागवड व प्रक्रिया यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. याप्रसंगी वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. बसवराज मास्तोळी, विभागीय अधीक्षक कृषी अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ए. यू. अरविंदेकर यांनी रूसा सेंटरविषयी माहिती दिली. डॉ. एम. एस. निंबाळकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. प्रथम सत्रामध्ये आर. जी. पाठक यांनी औषधी वनस्पतींसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. कृषी विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. एस. बी. चौधरी यांनी औषधी व सुगंधी वनस्पतींची माहिती व उपयोग याविषयी व्याख्यान दिले. द्वितीय सत्रामध्ये शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावर उपाय याविषयी चर्चा झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2018
Times of India

# Fill in internal marks within deadline: SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The education department of Shivaji University, Kolhapur (SUK) has asked the faculties associated with the assessment and evaluation of answer sheets to submit the internal marks online within the stipulated time to avoid any kind of discrepancy.

The April 10 circular from the exam department has urged the college, the university department and distance education department officials to feed in the marks online within the deadline.

It said that for the exams which have been conducted in March 2018, an online link will be available to feed in the marks by April 19. For the exams which will be held in April, the link will be available by May 11. For the exams in May, the link will remain active till May 30.

The circular said if the marks are not fed within the given deadline when the link is active, the marks will not reflect in the final result. Such complaints have been received by the department from students.

It has asked officials concerned to make sure the marks are registered carefully so as to avoid any issues in future that will only increase the work load of the exam department.

An official from the exam department said feeding marks online within the deadline not only saves time but also ensures the results were announced early. An April 4 circular from SUK, said the chancellor's office has made it mandatory to announce results within 30 days of the last paper of a particular examination.